राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६०८४/२०२६

श्री.अनिल काशिनाथ रणदिवे
वॉर्ड नं. २, दांडेकर प्लॉट, रुम नं.६,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर-४१३ ७०९.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंधेरी (प) मुंबई-४०० ०५८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंधेरी (प) मुंबई-४०० ०५८.

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>

अपीलकर्ता	:	अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित/अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	उपस्थित/अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
२६.०४.२०२१	--	०६.०७.२०२१	--

अपिलार्थीनी दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी श्री.व्ही. व्ही. सोनजे, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक-१ अंधेरी यांनी झालेल्या कामाची तपासणी करून बिले लिहून मंजुरीसाठी विभागीय कार्यालयास सादर केली आहेत त्या कामांचे नांव, तपासणी करणाऱ्या शाखा अभियंताचे नांव यांची सन २०२१ सालची तपशीलवार माहिती मिळावी अशी विनंती केली आहे.

त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी कुठलीच माहिती ३० दिवसांच्या कालावधीत दिली नसल्याने दिनांक ६ जुलै २०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला.

त्यावर तत्कालीन अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक २७ ऑगस्ट २०२१ रोजी सुनावणी आयोजित केली होती. तथापि, अपिलार्थीनी ज्यांच्या संदर्भात माहिती मागितली होती तेच अपिलीय अधिकारी असल्याने नैसर्गिक न्यायाला धरून अपील निकाल झालेला नसल्याचे नमूद करीत प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

दिनांक २९ जुलै २०२१ रोजी झालेल्या सुनावणीत अपिलार्थी गैरहजर असल्याचे नमूद करीत अपिलार्थीना कार्यालयीन जोडपत्रामध्ये नमूद केलेली माहिती प्राप्त करून घेण्याबाबत स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष नोंदवित अपील अर्ज निकाली काढलेला आढळून येतो.

अपिलार्थी आज प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन पद्धतीने उपस्थित नसल्याची तसेच त्यांना अपेक्षित असणारी माहिती ही कार्यालयात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

अपिल क्र.६०८४/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १५-०७-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**